दि.दावा.क्र. ३४/२०१८
प्रतापसिंग व इ. वि.ओंकारसिंग व इतर
नि. ३४
प्रतिवा.सा.क्र.१

वादीने निशाणी ५५ वरील आदेशाची पुर्तता केली. प्रतिवादीचा सा. क्रं. १ हजर. साक्षीदाराचा उलटतपास खालीलप्रमाणे नोंदविण्यात आला.

**प्रतिवादीचा सा.क्र.१ चा उलटतपास शपथेवर वादीतर्फे विधीज्ञ भुजबळ यांचेमार्फत सुरु....**

०९– आम्ही प्रतिवादी व वादीचे वडील गजानन असे चार भाउ आहोत/होतो. दावा मिळकत ही आमची वडीलोपार्जित मिळकत आहे. माझे वडील निहालसिंग हे मी इयत्ता चौथी मध्ये असतांना मयत झाले आहेत. माझी आई पारुबाई ही सन १९९५ मध्ये मृत्युमुखी पावली.

प्रश्न क्रं. १ तुमचे आई–वडील हयात असतांना तुमच्या चार भावादरम्यान वाटण्या झाल्या होत्या काय?

उत्तर: माझी आई हयात असतांना आमच्या चार भावादरम्यान वाटण्या झाल्या होत्या.

हे म्हणणे खरे नाही की, वाटणीवेळी आमच्या बहिणींनी वादग्रस्त मालमत्तेमधुन त्यांचा हक्क सोडला होता. पारुबाई यांनी आमच्या दरम्यानच्या वाटण्या हया तोंडी केल्या होत्या. वाटण्या केल्या तेव्हा मी समजदार होतो. वाटण्या केल्या त्यावेळी तेथे कोणीही साक्षीदार म्हणुन हजर नव्हते. सदर वाटणी ही सन १९९१–९२ मध्ये झाली होती. वाटणीनुसार आमच्या हिस्सांच्या नोंदी राजस्व दप्तरी सन १९९१–९२ नंतर झाल्या नव्हत्या. वाटणीनुसार आम्ही आमच्या हिस्सांची नोंद महसुल दप्तरी का केली नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. सन १९९१– ९२ च्या वाटणीनुसार वाद मालमत्ता ही आम्हा चार भावादरम्यान विभागण्यात आली नव्हती. आजरोजी दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर आम्हा प्रतिवादींच्या नोंदी आहेत. आम्ही प्रतिवादींनी वादग्रस्त जमीनीच्या ७/१२

उतान्यावर आम्हा तिघांच्याच नोंदी करुन घेतल्या आहेत. मी ३० वर्ष शिक्षक म्हणुन कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत सोडल्यास प्रतिवादी व मयत गजानन यांची इतर कोणतीही वडीलोपार्जित मिळकत नव्हती.

१०– गट क्रं. २६४ मौजे कोथळी ही शेतजमीन प्रतिवादी व मयत गजानन यांची वडीलोपार्जित मालमत्ता होती. सदर गट क्रं. २६४ ही आमची वडीलोपार्जित मालमत्ता होती हे दर्शविणारा दस्त मी पटलावर दाखल केला नाही. गट क्रं. २६४ ही वादी व प्रतिवादी यांचे ताबे व मालकीत आजरोजी नाही. असे काही घडले नाही की, सन २००६ मध्ये आमचे दरम्यान वाटण्या झाल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सन २००६ च्या वाटणीआधारे आमच्या नावाची नोंद ७/१२ उतान्यावर सन २००७ मध्ये झाली होती. वादी यांनी हक्कसोड केल्याबाबतचा लेख मी प्रस्तुत प्रकरणात दाखल केला नाही. मी सदर हक्कसोड लेख प्रकरणात दाखल करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी आमचे हक्कात हक्कसोड लेख लिहुन दिला असे मी खोटे सांगत आहे. वादी यांनी करुन दिलेला हक्कसोड लेख हा दुय्यक निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करण्यात आलेला नव्हता. फेरफार ४७० हा वाटणी पत्रकावरुन घेण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, लेखी वाटणापत्रान्वये घेण्यात आलेला फेरफार क्रं. ४७० हा बोगस घेण्यात आलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्रं. ४६९ व ४७० हे मी एकाच दिवशी करुन घेतले आहेत. आमच्या राहत्या जागा हया देखील वेगवेगळया झाल्या आहेत.

११– माझे भाउ गजानन हे सन २००६ मध्ये मयत झाले आहे. माझे भाउ गजानन हे मयत झाल्यानंतर फेरफार क्रं. ४६९ व ४७० घेण्यात आला होता. माझा भाउ गजानन वादी यांच्या

नावाची नोंद वादग्रस्त जागेच्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचा दावा मिळकतीमध्ये हिस्सा असल्यामुळे त्यांच्या नावाची नोंद ७/१२ उताऱ्यावर घेण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांचा हिस्सा नाकारण्यासाठी आम्ही प्रतिवादींनी आमच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादी व आमच्या दरम्यान अथवा गजानन व आमच्या दरम्यान वाटण्या झालेल्या नसतांना देखील आम्ही प्रतिवादींनी आमच्या नावाची नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याला घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात केलेल्या सर्व बाबी खोटया कथन केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी वादींचा हिस्सा डावलण्याकरीता खोटे शपथपत्र दाखल करुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**पुर्नःतपास काही नाही.**

दि. १५/०२/२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.के.

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD

Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.02.15 17:11:00 +0530

(स.श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.

श्रवणोत्तर स्विकृत/समक्ष,

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD

Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.02.15 17:11:11 +0530

(स.श्री. गायकवाड)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.